अग्रलेखांचा नवा काळ बादशहा

संस्थापक : नाट्याचार्य कृष्णाजी प्रभाकर खाडिलकर

नवा काळ

।। न मे भक्त: प्रणश्यति ।।

अग्रलेखांचा नवा काळ बादशहा

# या घोषणाबाजीची गिनीजबुकातच नोंद व्हावी

गेल्या महिन्याभरात केंद्र आणि राज्य सरकारने नवनव्या योजनाचा असा काही पाऊस पाडला की त्याचा जागतिक विक्रम व्हावा. त्या विक्रमाची गिनीज बुकामध्ये सहजपणे नोंदही होऊ शकेल. घोषणांचा हा पाऊस निवडणुकीचा हंगाम पाहून पाडला गेला. आता या घोषणांचे खतपाणी सत्ताधारी पक्षाला निवडणुकीत किती पीकपाणी देते, हे येत्या दोन-चार महिन्यांत स्पष्ट होईल. केंद्र सरकारने महिन्याभरामध्ये जवळपास किमान ५० हजार कोटींच्या नव्या योजनाचा शुभारंभ केला असावा, तर महाराष्ट्र सरकारने १५ दिवसांमध्ये २० हजार कोटींच्या नव्या योजनांची घोषणाबाजी करून निवडणुकीच्या दिवाळीची आतषबाजी साजरी केली. निवडणुका आल्यानंतर राजकारणाच्या किंवा सत्ताधाऱ्यांच्या अंगात एवढा उत्साह कुठून संचारतो हेच कळत नाही. निवडणुकीच्या तोंडावर त्यांनी लावलेला कामाचा हा धडाका त्यांच्यातील कार्यक्षमता आणि इच्छाशक्तीसुध्दा दाखवणारा म्हणावा लागेल. एकाच महिन्यात २०-२० हजार कोटींच्या कामाचे शुभारंभ होतात. राज्यातील गुंतवणूक वाढविण्याकरिता मोठमोठ्या रकमांचे करारमदार होतात. ही कामे जर ते या वेगाने करू शकतात, तर मग पाच वर्षांमध्ये राज्यात किंवा देशामध्ये किती भरमसाठ विकास कामे होऊ शकली असती याचा सहज अंदाज येतो. निवडणुका आल्या तरच कामे करायची अशी जर या सत्ताधाऱ्यांची किंवा राजकारण्यांची इच्छा असेल तर मग, आम्ही तर असे म्हणू दरवर्षी निवडणुका व्हायला हव्यात. म्हणजे त्या निमित्ताने विकासाची कामे तरी होतील आणि सामान्य माणसाच्या समस्याही सुटतील. सत्तेची खुर्ची टिकवून ठेवण्याकरिता हा सगळा घोषणांचा बाजार भरविला जातो. प्रत्यक्षात त्याचा मतदानावर किती परिणाम होतो हे कधीच सांगता येत नाही. परंतु, मतदार नाराज होऊ नये किंवा आपला मोठा पराभव होऊ नये या भीतीनेच या घोषणाबाजीचा धुरळा उडवला जातो. लोकांच्या डोळ्यात धूळफेक करून आपला स्वार्थ साधण्याचा हा प्रयत्न असल्यामुळे लोकदेखील या घोषणाबाजीवर फारसा विश्वास ठेवीत नाहीत.

### राजकीय फायद्यासाठीच घोषणा

आश्चर्य वाटावे अशीच ही सर्व परिस्थिती आहे. गेली १० वर्षे रखडलेल्या योजना गेल्या १० दिवसांत अशा काही सुसाट वेगाने पळायला लागल्या की, त्या सरकारी योजना आहेत की, एखाद्या खाजगी कंपनीचा उपक्रम आहे अशीच शंका येऊ लागते. याची वानगीदाखल आम्ही दोनच उदाहरणे सांगतो की, एक म्हणजे मुंबईसह राज्यातल्या २००० पर्यंतच्या झोपड्यांना संरक्षण देण्याचा निर्णय घेतला गेला आणि दुसरे उदाहरण म्हणजे तातडीची रुग्णवाहिका सेवा मोफत स्वरूपात सरकारने आता उपलब्ध करून दिली. आता १०८ क्रमांक डायल केल्याबरोबर डॉक्टरसह अनेक सुविधा असलेली रुग्णवाहिका घटनास्थळी पोहोचवण्याची व्यवस्था केली गेली आहे. या दोन्ही गोष्टींची मागणी गेल्या अनेक वर्षांपासून होत होती. त्यात झोपडपट्ट्यांचा प्रश्न तर प्रत्येक निवडणुकीमध्ये उगाळला जात असतो. सर्वप्रथम १९९० च्या सुमाराला मुंबईतल्या १९८५ पर्यंतच्या झोपड्यांना कायम करण्याची मागणी केली गेली. तो निर्णय १९९५ मध्ये झाला त्यानंतर २००४ च्या निवडणुकीमध्ये २००० पर्यंतच्या झोपड्यांना संरक्षण दिले जावे अशी मागणी झाली. याबाबत काँग्रेस पक्षाने २००९ च्या विधानसभा निवडणुकीच्या आपल्या जाहीरनाम्यात आश्वासनही दिले होते. परंतु गेल्या ४ वर्षांत याबाबत कोणताच निर्णय झाला नाही. प्रकरण कोर्टात गेल्यामुळे सरकारला एक कारण मिळाले. मात्र आता बरोबर निवडणुकीच्या तोंडावर २००० पर्यंतच्या झोपड्यांना संरक्षण देण्याची घोषणा केली गेली आहे. हेच काम सरकार दोन वर्षांपूर्वीसुध्दा करू शकले असते. परंतु सतत सत्तेचा आणि मतांचा विचार करण्याच्या राजकीय हेतूमुळे ही सामान्य माणसाची समस्या लटकवून ठेवली गेली. सत्ताधाऱ्यांची इच्छा असेल तर ते कोणत्याही क्षणी निर्णय घेऊन त्याची अंमलबजावणी करू शकतात, पण एखादे काम करायचेच नसेल किंवा मतपेटीसाठीच करायचे असेल त्यासाठी असे मुहूर्त निवडले जातात. दुसरे उदाहरण असेच आहे. महाराष्ट्रात दरवर्षी रस्ते अपघातात अक्षरश: हजारो लोक मृत्युमुखी पडतात. शहरामध्ये तातडीने उपचार उपलब्ध न झाल्याने अनेक गरिबांना बळी पडावे लागते. अशा परिस्थितीत एखादा अपघात घडल्यानंतर किंवा एखाद्या रुग्णाला त्यांची गरज असताना उपचार मिळणे आवश्यक ठरते. म्हणूनच परदेशाप्रमाणे इथेसुध्दा अपघात घडल्यानंतर पुढच्या १८ ते २० मिनिटांमध्ये त्या ठिकाणी रुग्णवाहिका पोहचायला हवी, अशा प्रकारची मागणी अनेक वर्षांपासून केली जात होती. भारतात तामिळनाडू राज्यात ही सेवा १० वर्षांपूर्वीच सुरू झाली महाराष्ट्रात त्याची सुरुवात होण्यासाठी २०१४ साल उजाडावे लागले. जर १० वर्षांपूर्वीच ही योजना सुरू झाली असती तर हजारो लोकांचे प्राण वाचू शकले असते.

### दरवर्षीच निवडणुका घ्या

या दोन्हीही उदाहरणावरून इच्छा असेल तर काम करू शकतो हे सिध्द होते. या गोष्टी करणे सरकारला सहज शक्य होते. ज्यात कोणतीही अडचण येण्याची फारशी शक्यता नव्हती. ती कामेदेखील सरकारने राजकीय हेतूने रेंगाळत ठेवली असेच म्हणावे लागेल. अशा अनेक योजनांचे उदाहरण देता येऊ शकते. आपल्या देशाचे दुर्दैव असे आहे की, समाजकारणाचे राजकारण झाले आहे. त्यामुळेच समाजाला आवश्यक असलेली कामेदेखील वेगाने होत नाहीत. प्रत्येक विकास कामाचा राजकीय चष्मा लावून विचार केला जातो. सत्ता, वेगवेगळी पदे, त्यापासून मिळणारे फायदे, कमिशन, टक्केवारी अशा सगळ्या स्वार्थी राजकीय हडेलहप्पीने समाजाचे फार मोठे नुकसान केले आहे. केंद्र आणि राज्य सरकारने निवडणुकीच्या तोंडावर अनेक कामांचा धडाका लावून त्याच हडेलहप्पीचे प्रदर्शन केले. मते मिळविण्यासाठी केलेला हा खटाटोप सत्ताधारी पक्षाला किती राजकीय लाभ देईल हे सांगता येत नाही. कारण यापूर्वीसुध्दा वाजपेयींच्या एनडीए सरकारने याच पध्दतीने कामाचा धडाका लावला. निवडणुकीच्या तोंडावर इंडिया शायनिंगच्या जाहिराती करून लोकांची मनधरणी करण्याचा प्रयत्न केला होता. पण लोकांनी त्याला भीक घातली नव्हती. तोच अनुभव युपीए आणि राज्यातल्या आघाडी सरकारला येऊ शकतो. एक मात्र खरे असे सरकार निवडणुकीच्या तोंडावरच कामाला लागणार असेल, तर दरवर्षीच निवडणुका घेतल्या तर लोकांची कामे तरी होतील असे सहजपणे वाटून जाते.